
27-06-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 6/26/2025 10:41 PM Page 1



एसजीपीडीए स्वच्छता रखडल्याने डासांची पैदास पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com



दुसऱ्या कसोटीत बुमराह अनुपस्थित ? पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, २७ जून २०२५ I पाने ४ I ₹ ४

I REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 I Volume 13, Issue 295 I Verna, I facebook.com/dainikherald I Friday 27 June 2025 I Pages 4 I ₹ 4

# ‘गोवा टॅक्सी ड्रायव्हर ॲप’चे अधिकृत लाँचिंग

## स्थानिक टॅक्सी चालक संघटनांचा विरोध कायम

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. २६ : राज्यातील टॅक्सी सेवा अधिक सुलभ, पारदर्शक आणि डिजिटल बनवण्याच्या दिशेने एक पाऊल टाकत गोवा सरकारने गोवा टॅक्सी ड्रायव्हर ॲप’चा अधिकृत शुभारंभ केला आहे. गोवा टॅक्सी, आमची टॅक्सी... या टॅगलाइनसह लाँच करण्यात आलेले हे ॲप पारंपरिक टॅक्सी चालकांसाठी सरकारच्या नव्या योजनेचा भाग आहे.**

टॅक्सी सेवा एकत्रित डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्याचा उद्देश असलेल्या या उपक्रमाला पारंपरिक टॅक्सी चालकांकडून तीव्र विरोध होत आहे. सरकारच्या मते, या नव्या योजनेमुळे स्थानिक वाहतुकीत



आधुनिकतेचा शिरकाव होणार असून, पर्यटकांनाही दर्जेदार सेवा मिळण्यास मदत होणार आहे.

याबाबत पर्यटन विभागाने ’ एक्स’ या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट करत ॲपच्या प्रमोशनल योजनांची घोषणा केली. या योजनेनुसार, सलग ३० दिवस सकाळी ८ ते रात्री ८ या वेळेत ॲपवर सक्रिय राहून किमान ५० राईड्स पूर्ण करणाऱ्या पहिल्या ५०० चालकांना २५ लिटर इंधन (पेट्रोल/डिझेल/सीएनजी) मोफत दिले जाणार आहे.

हा उपक्रम गोवा ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे २०२५ च्या मसुद्यानंतरच राबवण्यात आला आहे. सदर मसुद्यावर ३० जूनपर्यंत सार्वजनिक अभिप्राय मागवण्यात आले आहेत. या धोरणामुळे ओला व उबरसारख्या राष्ट्रीय ॲप-आधारित सेवांसाठी गोव्यातील बाजार खुला होणार असल्याच्या भीतीने पारंपरिक टॅक्सी संघटनांनी या मसुद्याला जोरदार विरोध केला आहे.

या विरोधाचा भाग म्हणून १,००० हून अधिक आक्षेप सादर करण्यात आले असून, या धोरणामुळे स्थानिक टॅक्सी व्यवसाय धोक्यात येईल, अशी भूमिका संघटनांनी घेतली आहे. त्यांनी हा मसुदा पूर्णतः रद्द करण्याची मागणी केली आहे.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांना ॲपच्या लाँचबाबत विचारले असता त्यांनी याबाबत अनभिज्ञता व्यक्त केली.

दरम्यान, पर्यटन संचालक केदार नाईक यांनी हेराल्ड मिडियाशी बोलताना स्पष्ट केले की, हे ॲप नवीन नाही. हे २०२३ मध्येच लाँच करण्यात आले होते.

पान २ ▶




# फेरी बोटीला दुहेरी इंजिनची जोड करण्याचा निर्णय

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पणजी, दि. २६ :** राज्यातील नदीमार्ग फेरी सेवांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या दोन घटनांनंतर, गोवा सरकारने सर्व फेऱ्यांना लवकरच दुहेरी इंजिनांनी सुसज्ज करण्याची घोषणा केली आहे. पाणी वाहून नेणाऱ्या रिकाम्या बार्जने बिघाडलेल्या फेरीला धडक दिल्यानंतर गंभीर दुर्घटना टळली आणि त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला.मंत्री सुभाष फळ देसाई यांनी गुरुवारी सांगितले की , आता पुढे सर्व फेऱ्यांना दोन इंजिन असणार आहेत. यामुळे एक इंजिन निकामी झाल्यास दुसरे इंजिन वापरता येईल आणि अशा अपघातजन्य स्थिती टाळता येईल.

देसाई यांनी यावेळी आरएनडीच्या ताफ्यातील फेऱ्यांच्या फिटनेसबाबतही माहिती दिली. आमच्या सर्व फेऱ्या वैध फिटनेस प्रमाणपत्रांसह कार्यरत आहेत आणि त्यांचे निर्धारित परिचालन आयुष्य १५ वर्षांचे आहे. मात्र, नागरिकांनीही जहाजावर प्रवास करताना सतर्क राहावे, असे त्यांनी स्पष्ट केले.

गोव्यातील फेरी सेवेबाबत काळजी



निर्माण करणाऱ्या घटनांमध्ये २५ जून रोजी टोल्टो फेरीमध्ये बिघाड झाला. पाण्याच्या प्रवाहात फेरी थांबली आणि त्याच वेळी एक रिकामा बार्ज त्या फेरीला धडकला. सुदैवाने, तातडीच्या प्रतिसादामुळे कोणतीही जीवितहानी झाली नाही. ही घटना आरएनडीच्या कार्यपद्धती आणि देखभाल व्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी ठरली.

त्याआधी २३ जून रोजी पहाटे, चोडण बेटाच्या किनाऱ्यावर नांगरलेली एक फेरी अचानक बुडाली. सुदैवाने तेव्हा फेरीवर कोणताही प्रवासी नव्हता, कारण फेरीने आपले कामकाज सुरू केले नव्हते. मात्र, या घटनेमुळे फेरींच्या तांत्रिक स्थितीबाबत जनतेत भिती निर्माण झाली आहे.

या अनुक्रमिक घटनांच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने बुधवारी बेती येथील नदी परिवहन संचालनालय कार्यालयाबाहेर आंदोलन केले. काँग्रेसने सरकारवर गंभीर निष्काळजीपणा आणि सार्वजनिक पायाभूत सुविधा सुरक्षेबाबत पूर्ण अपयश असा आरोप केला.

पक्षाच्या नेत्यांनी अशा घटनांना गुन्हेगारी स्वरूपाची दुर्लक्षाची उदाहरणे म्हणत, फेरी सेवा सुरक्षेच्या बाबतीत सरकारने जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी केली.

या घटनांमुळे गोव्यातील फेरी सेवेच्या संरचना आणि व्यवस्थापनात सुधारणा करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. दुहेरी इंजिनांची योजना ही सुरुवात असली तरी, नियमित तपासणी, कर्मचारी प्रशिक्षण आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणेची क्षमता वाढवणे ही तितकीच आवश्यक बाब ठरत आहे.

सरकारने आता सुरक्षिततेस प्राधान्य दिल्याचे दाखवत पावले उचलली असली, तरी या उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी होणे आणि पारदर्शकपणा राखणे, हीच भविष्यातील खरी परीक्षा ठरणार आहे.

# खांडेपारमध्ये बेकायदेशीर संरक्षक भिंतीमुळे पुराचा धोका

▶ ग्रामस्थ आक्रमक, पंचायतीकडून तत्काळ कारवाईची मागणी

■ *टीम दैनिक हेराल्ड*



**फोंडा, दि. २६ :** पावसाळा सुरू होताच कुर्टी -खांडेपार परिसरातील ग्रामस्थांची झोप उडाली असून, खांडेपार नदीच्या काठावर सखल भागात बांधण्यात आलेली बेकायदेशीर संरक्षक भिंत आणि मोठ्या प्रमाणावर भू-भरणामुळे पुराचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. स्थानिकांनी या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत पंचायतीकडून तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

नदीकाठच्या बागा भागात सुमारे १०० मीटर लांब आणि ४ मीटर उंचीची संरक्षक भिंत उभी करण्यात आली असून, ती कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय बांधण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच, भूखंड विकासाच्या हेतूने सुमारे ५०० हून अधिक ट्रक भराव टाकण्यात आल्यामुळे* सखल भागात गाळ पसरून पुराच्या पाण्याचा मार्ग अडवला जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

ग्रामस्थांनी याबाबत अनेक वेळा तक्रारी दाखल केल्या असूनही पंचायत तटस्थ राहिल्याचा आरोप करण्यात येत आहे. बुधवारी बोलावण्यात आलेल्या पंचायतीच्या बैठकीस तक्रारदार ग्रामस्थ उपस्थित होते; मात्र संबंधित जमीन मालक अनुपस्थित राहिल्याने संतप्त प्रतिक्रिया उमटली.

तक्रारींनुसार, जमीन मालक विराज खांडेपारकर हे तक्रारदारांची ओळख मागत असून, त्यावरून ग्रामस्थ अधिकच संतप्त झाले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, हा मुद्दा व्यक्तिगत नव्हे, तर संपूर्ण गावाच्या सुरक्षिततेचा आहे.

सीताराम गावडे, नामदेव गावडे आणि इतरांनी सांगितले की, १९८२ आणि २०२१ मधील पुरात अनेक घरे कोसळली होती. अशा इतिहासाच्या पार्श्वभूमीवर अतिक्रमण आणि बेकायदेशीर भिंतीमुळे संभाव्य आपत्तीची भीती अधिकच वाढली आहे. दरवर्षी पुराचा सामना करावा लागतो. यंदा सखल भागांमध्ये अडथळा झाल्यास स्थिती हाताबाहेर जाईल, असे ग्रामस्थांनी नमूद केले.

२९ मे रोजी सरपंच नीलकांत नाईक व सचिव यांच्या नेतृत्वाखाली पंचायतीने संरक्षक भिंत, बेकायदेशीर रस्ता आणि लँडफिलिंगसह तपासणी केली होती. तपासणीत सर्व गोष्टी बेकायदेशीर असल्याचे स्पष्ट असूनही, जवळपास महिनाभरात कोणतीही कारवाई न झाल्याने ग्रामस्थ भयभीत झाले आहेत.

सरपंच नीलकांत नाईक यांनी सांगितले की, तक्रारींची शहानिशा करून संरक्षक भिंतीबाबत आवश्यक ती कारवाई केली जाईल. ते म्हणाले की, संबंधित मालकाने तक्रारदारांविषयी गंभीर आक्षेप घेतले असून, त्यांची ओळख मागितली आहे. तथापि, ग्रामस्थ उपस्थित होते व मालकच अनुपस्थित राहिला.

गावकऱ्यांनी ठराव करून सांगितले आहे की, सर्वेक्षण क्र. १७६/१ मध्ये कोणतेही बांधकाम अथवा भू-भरण्याला परवानगी देऊ नये. पंचायत लवकरच सीआरझेड, डब्ल्यूआरडी, बीडीओ व संबंधित अधिकाऱ्यांकडे अधिकृत तक्रार दाखल करणार आहे, असे सरपंचांनी स्पष्ट केले.

खांडेपार नदी ही म्हादईची उपनदी असून, पावसाळ्यात ती ओव्हरफ्लो होऊन घरांमध्ये पाणी शिरण्याची शक्यता* अधिक असते. अशा पार्श्वभूमीवर सखल भागात भू-भरण आणि संरक्षक भिंतीसारखी अतिक्रमणे ग्रामस्थांच्या सुरक्षिततेवर थेट आघात करत असल्याने संपूर्ण गाव चिंतेत आहे.

# नशामुक्त गोवा’साठी पावले उचलली जात आहेत - मुख्यमंत्री

## डिचोलीत अमलीपदार्थविरोधी जनजागृती फेरी | कुर्टीतही विद्यार्थ्यांत जनजागृती कार्यक्रम

**साखळी I फोंडा, दि. २६ :**

राज्यात अमलीपदार्थांची वाढती साखळी तोडण्यासाठी राज्य पोलीस आणि अंमलीपदार्थ विरोधी पथक सक्रीय असून, त्यांना राज्य सरकारचा संपूर्ण पाठिंबा आहे. मात्र या मोहिमेला यश यावे, यासाठी पालकांनी आपल्या मुलांकडे अधिक दक्षतेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी बुधवारी साखळी येथे केले.तर कुर्टी येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृतीपर व्याख्यान व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

मुख्यमंत्री सावंत डिचोली पोलीस स्थानकाच्या मार्गदर्शनाखाली आयोजित अमलीपदार्थविरोधी जनजागृती फेरीच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. या प्रसंगी डिचोली पोलिस निरीक्षक विजय राणे, साखळी नगराध्यक्ष सिद्ध प्रभू, माजी सरपंच संजय नाईक, माजी नगराध्यक्ष राया पार्सेकर, पंच सदस्य नारायण गावस व इतर मान्यवर उपस्थित होते.







मुख्यमंत्री सावंत यांनी बावटा’ दाखवून फेरीचा शुभारंभ केला. ही फेरी साखळी हाऊसिंग बोर्ड येथून सुरु होऊन डिचोली शहरात पोहोचली आणि मुळगाव-नागदेवता मार्गे डिचोली पोलीस स्थानकात समारोप करण्यात आला. फेरीमध्ये पोलीस निरीक्षक, सहाय्यक अधिकारी, हवालदार आणि पोलीस शिपाई सहभागी झाले होते.

ड्रग्स विरोधातील लढा पोलीस यंत्रणा लढत आहे, पण यामध्ये पालकांची आणि समाजाचीही भूमिका महत्त्वाची आहे. रात्री उशिरा घराबाहेर राहणाऱ्या मुलांविषयी पालकांनी चौकशी करावी. तसेच अनोळखी व्यक्तीकडून कोणतेही पार्सल दुसऱ्या ठिकाणी पोहोचविण्याचे काम कोणत्याही पैशांच्या आमिषामुळे स्वीकारू नये, असे आवाहन त्यांनी केले.

मुख्यमंत्री सावंत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नशामुक्त भारत’ या उपक्रमाशी सुसंगत असणारी नशामुक्त गोवा’ मोहीम लवकरच सुरू होणार असल्याचेही जाहीर केले. राज्य सुरक्षित ठेवण्यासाठी, अशा प्रकारच्या गैरकृत्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींची माहिती पोलिसांना द्यावी, असेही त्यांनी आवाहन केले.

दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय अंमलीपदार्थविरोधी दिनानिमित्त कामाक्षी एज्युकेशन सोसायटीच्या उच्च माध्यमिक विद्यालय, कुर्टी येथे विद्यार्थ्यांसाठी जनजागृतीपर व्याख्यान व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

प्राचार्य श्रीमती सुरेखा नाईक यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करत त्यांना ड्रग्जपासून दूर राहा’ असा संदेश दिला. समुपदेशक कल्पा फात्रेकर यांनी पुरावे स्पष्ट आहेत, प्रतिबंधात गुंतवणूक करा या विषयावर सादरीकरण सादर केले. त्यांनी ड्रग्ज म्हणजे काय, त्याचे शारीरिक आणि मानसिक परिणाम, समवयस्क दबावापासून स्वतःला कसे वाचवावे, देश-विदेशातील सध्याची परिस्थिती आणि ड्रग्ज बाळगल्यास कायदेशीर कारवाई काय होते याविषयी माहिती दिली.

शाळेच्या शिक्षक ट्र. मॉली अब्राहम यांनी ड्रग्जला नाही म्हणा’ या विषयावर पोस्टर स्पर्धेचे आयोजन केले. स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्य सुरेखा नाईक यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.राज्य सरकार, पोलीस यंत्रणा, शैक्षणिक संस्था आणि स्थानिक प्रतिनिधी यांच्यातील समन्वयातून नशामुक्त गोवा’ ही संकल्पना प्रत्यक्षात येण्याची अपेक्षा आता व्यक्त केली जात आहे.

## निवडक

### रुद्रप्रयागमध्ये अलकनंदा नदीत कोसळली बस

**डेहराडून, दि. २६ :** उत्तराखंडमध्ये रुद्रप्रयाग-बद्रीनाथ हायवेवर घोलतीर जवळ भीषण रस्ते अपघात झाल्याची माहिती समोर येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार एक बस अलकनंदा नदीत कोसळली यामुळे भीषण अपघात झाला आहे. घटनास्थळी बचावक कार्यासाठी रेस्क्यू टीम रवाना झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १८ प्रवाशांना घेऊन जाणारी बस ब्रदीनाथला चालली होती. त्यावेळी चालकाचं बसवरचं नियंत्रण सुटलं. ही बस नदीत कोसळली. स्थानिकांना ही बाब कळल्यानंतर त्यांनी याबाबतची माहिती पोलिसांना कळवली. पोलीस आणि एसडीआरएफचं पथक या ठिकाणी आलं. या बसमध्ये चालकाहह एकूण २० जण बसलेले होते. या बसमध्ये उदयपूर (राजस्थान) आणि गुजरात येथील सोनी परिवार चारधाम यात्रेसाठी आला होता. याच बसचा अपघात झाला आहे. एका व्यक्तीचा या घटनेत मृत्यू झाला आहे. विभागीय आयुक्त विनय शंकर पांडे यांनी माहिती दिली आहे की या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. सात जण जखमी झाले आहेत आणि त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. इतर बेपत्ता प्रवाशांचा शोध पोलीस आणि एसडीआरएफकडून घेतला जातो आहे.

### हिमाचलमध्ये ढगफुटी झाल्याने हाहाकार!

**मंडी, दि. २६ :** हिमाचल प्रदेशात बुधवारी ढगफुटी झाल्याने अचानक पूर आला आणि मुसळधार पावसामुळे २ जणांचा मृत्यू झाला. तर २० जण वाहून गेल्याची शक्यता आहे. कांगडा जिल्ह्याच्या मनुनी खड्ड येथून दोन मृतदेह हाती घेण्यात आले. तर इंदिरा प्रियदर्शिनी जलविद्युत परियोजनेच्या ठिकाणी एका कामगार कॉलनीत राहणारे १५ ते २० जण वाहून गेल्याची शक्यता आहे.

अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पावसामुळे या परियोजनेचे काम थांबवण्यात आले होते. त्यामुळे कामगार या जवळच्या ठिकाणी आराम करत होते. तेव्हा मनुनी खड्ड आणि जवळच्या नाल्यातील पाणी वाढले आणि हे कामगार वाहून गेले. कुल्लूमध्येही अनेक ठिकाणी पुरामुळे उद्ध्वस्त झाल्याचे चित्र दिसत आहे. एका व्हिडिओमध्ये एक वाहन चिखलातील पाण्यात वाहताना दिसत आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाला. यामुळे अनेक ठिकाणी पाण्याची पातळी उंचावली.

### अमेरिकेची नवी चाल, स्वस्त रशियन तेलाला बसेल खीळ

**नवी दिल्ली, दि. २६ :** सर्वसामान्य लोक गेल्या काही दिवसांपासून महागाईतून दिलासा मिळण्याच्या अपेक्षित दिवस काढत आहेत पण त्यांना अजूनही दैनंदिन गोष्टींसाठी जास्त किंमत मोजावी लागत असून सामान्यां महागाईत आणखी भर पडू शकते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीने गेल्या ४ महिन्यांतील उच्चांकी पातळी गाठली असून अमेरिकेने रशियावर लादलेल्या नवीन निर्बंधांमुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत भडका उडाला आहे ज्याचा सर्वाधिक परिणाम भारत आणि चीनवर होईल असे मानले जाते. असं का घडत आहे हे सांगण्यापूर्वी नवीन निर्बंध काय आहेत जाणून घेऊया.

अमेरिकन ट्रेझरीने गॅझप्रॉम नेफ्ट आणि सर्गुटनेफ्तेगाझ या दोन रशियन तेल उत्पादक कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत. याशिवाय, १८३ तेल वाहून नेणाऱ्या जहाजांवरही बंदी घालण्यात आली आहे. मॉर्गन स्टॅनलीने म्हटले की, ज्या टँकरवर बंदी घालण्यात आली आहे त्यांनी २०२४ मध्ये सरासरी १.५ दशलक्ष बॅरल कच्चे तेल वाहून नेले, ज्यापैकी बरेच भारत आणि चीनला कच्चे तेल पुरवण्यासाठी वापरले गेले.

देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत सुमारे दहा महिन्यांपासून कोणताही बदल झालेला नाही पण लवकरच ही परिस्थिती बदलू शकते.